महाराष्ट्र शासन- कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अ/ ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई -४०० ००५
दुरध्वनी क्र. :०२२ २२१६३३५१/५२ ई-मेल: pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१४०२७(११)/३/२०२६-२१ दि. / /२०२६

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक, (प्रकल्पांतर्गत सर्व)**

**विषय: खरीप हंगाम २०२६ करिता भरडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी बियाणे मिनीकीट वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना...**

उपरोक्त विषयास अनुसरून, प्रकल्पांतर्गत गावांमध्ये बहुपीक पद्धतीस प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने भरडधान्य पिकांच्या मिनीकीट प्रात्यक्षिक कार्यक्रमाचा समावेश प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये करण्यात आला असून, त्यानुसार खरीप हंगाम २०२६ करिता ज्वारी, बाजरी व नाचणी पिकांचे बियाणे मिनीकीट वितरित करण्यात येत आहेत.

सदर पत्रासोबत **बियाणे मिनीकीट वितरण मार्गदर्शक सूचना** जोडण्यात आलेल्या आहेत. तसेच, सहपत्रित **परिशिष्ट-१** नुसार बियाणे मिनीकीट वितरणाचे लक्षांक निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार, येत्या खरीप हंगामात भरडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने सदर प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे प्रभावी सनियंत्रण करावे व फलनिष्पत्तीबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Digitally signed by
SANTOSH BASAVESHWAR MAMADAPURE
Date: 22-05-2026 18:32:22

**मा. प्रकल्प संचालक यांच्या मान्यतेने,**

**प्रकल्प उपसंचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव,

१. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, अकोला
२. संचालक, विस्तार व प्रशिक्षण, कृषि आयुक्तालय, पुणे
३. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (संबंधित)
४. प्रकल्प संचालक, आत्मा (संबंधित)
५. उपविभागीय कृषि अधिकारी (संबंधित)

# खरीप हंगाम २०२६-२७ करिता भरडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी बियाणे मिनीकीट वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत मराठवाडा, विदर्भ तसेच उत्तर महाराष्ट्रातील नाशिक व जळगाव अशा एकूण २१ जिल्ह्यांची निवड करण्यात आलेली आहे. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाचे निर्देश प्राप्त असून त्यानुसार प्रकल्पाचा अंमलबजावणी आराखडा मंजूर करण्यात आलेला आहे. सदर आराखड्यानुसार हवामान बदल, अनियमित पाऊस व पारंपरिक एक पीक पद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा विचार करता पीक विविधीकरणाला चालना देणे आवश्यक झाले आहे.

या पार्श्वभूमीवर ज्वारी, बाजरी व नाचणी यांसारख्या भरडधान्य पिकांच्या लागवड क्षेत्रवाढीस विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. ही पिके हवामान बदलास अनुकूल असून पौष्टिक मूल्यांनी समृद्ध आहेत. प्रकल्प क्षेत्रामध्ये ज्वारी, बाजरी व नाचणी यांसारख्या पिकांची लागवड पूर्वीपासून करण्यात येत असून भरडधान्यांच्या पौष्टिक मूल्यांविषयी वाढती जनजागृती तसेच प्रकल्प क्षेत्रातील अनुकूल हवामान परिस्थिती लक्षात घेता या पिकांच्या क्षेत्र व उत्पादकतेत वाढ करण्याची मोठी संधी उपलब्ध आहे.

या अनुषंगाने प्रकल्प क्षेत्रामध्ये ज्वारी, बाजरी व नाचणी यांसारख्या भरडधान्य पिकांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या उपक्रमामुळे एकाच पिकावरील अवलंबित्व कमी होऊन जमिनीचे आरोग्य सुधारण्यास, शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब वाढण्यास व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

याकरिता प्रकल्प गावांमध्ये पीक विविधीकरणास प्रोत्साहन देण्यात येत असून शेतकऱ्यांना भरडधान्यांचे बियाणे मिनीकिट (Mini Kits) उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदर बाब लक्षात घेऊन प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सन २०२६-२७ मध्ये खरीप हंगामात भरडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी बियाणे मिनीकीट वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**बियाणे मिनीकीट वितरण अंमलबजावणी कार्यपद्धती:**

१. प्रकल्प गावातून बियाणे मिनीकीट प्रात्यक्षिक घेण्यासाठी इच्छूक शेतकऱ्यांची निवड करावी. निवड केलेल्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे.

२. प्रकल्पाच्या गावांमध्ये इतर योजनेतील त्याच पिकांचे मिनीकीट वाटप कार्यक्रम घेण्यात येऊ नये जेणेकरून लाभाची द्विरुक्ती टाळता येईल.

३. सदर उपक्रमासाठी वनपट्टाधारक शेतकरी, अनु. जाती, अनु. जमाती, दिव्यांग तसेच महिला शेतकऱ्यांना प्राधान्याने सहभागी करून घ्यावे.

४. एका शेतकऱ्यास एका पिकाचे फक्त एकच मिनीकीट वितरीत करावे व सदर मिनीकीट कमाल एक एकर क्षेत्रासाठी असावे.

५. ज्वारी बियाणे मिनिकीट पॅकिंग साईज ३ कि.ग्रॅ व बाजरी मिनिकीट पॅकिंग साईज १.५ कि.ग्रॅ असून सदर बियाणे मिनिकीट एक एकर क्षेत्राकरिता वापरण्यात यावे तर नाचणी पिकाचे बियाणे मिनिकीट पॅकिंग साईज १ कि.ग्रॅ असून सदर बियाणे मिनिकीट २० गुंठे क्षेत्राकरिता वापरण्यात यावे.

६. लाभार्थ्याने बियाणे मिनीकीटचा वापर येत्या खरीप हंगाम पेरणी करिता करणे बंधनकारक राहील.

७. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) या शासकीय बियाणे उत्पादक यंत्रणेकडून बियाणे मिनिकीट स्वरूपात उपलब्ध होणेकरिता **जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी** यांनी तालुकानिहाय व वाणनिहाय पुरवठा आदेश देण्यात यावा.

८. उपरोक्त यंत्रणेशी समन्वय ठेवून संबंधित तालुक्यामध्ये मिनिकीट वेळेत वितरीत केले जाईल याबाबत स्थानिक पातळीवर नियोजन व अंमलबजावणी करावी.

९. मिनीकीट प्राप्त झालेनंतर ५ दिवसांच्या आत सहाय्यक कृषि अधिकारी यांनी संबंधित समूह सहाय्यकाच्या मदतीने निवडलेल्या शेतकऱ्यांना मिनीकीट वितरीत करण्यात यावे.

१०. मिनिकीट वितरित केलेल्या प्रत्येक शेतकऱ्याची नोंद समूह सहाय्यक यांनी **प्रकल्पाच्या** SMA या App वर करावी तसेच **प्रात्यक्षिक क्षेत्राचा** geo-tagging **फोटो** SMA App वर अपलोड करणे बंधनकारक राहील.

११.मिनीकीट वितरित केलेल्या प्रत्येक शेतकऱ्याची स्वतंत्र नोंद साठा नोंदवहीमध्ये करण्यात येईल, याची तालुका कृषि अधिकारी यांनी खात्री करावी.

१२.तालुका कृषि अधिकारी व बियाणे पुरवठादार संस्थेकडून संयुक्त बियाणे वितरण अहवाल प्राप्त झाल्यानंतर, शेतकऱ्यांच्या प्राप्तीस्वाक्षरीच्या आधारे संबंधितांना बियाणे प्राप्त झाल्याची खात्री करून **उपविभागीय कृषि अधिकारी** यांनी देयकाची अदायगी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून पूर्ण करावी.

१३.प्राप्त यादीच्या आधारे तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त मंडळ कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी यांचे मदतीने एकूण शेतकऱ्यांच्या यादृच्छिक (Randomly) पद्धतीने किमान ३% व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी १% लाभार्थ्यांची तपासणी करून बियाणे मिनीकीट मिळाल्याची खात्री करावी.

१४.खरीप हंगामात लाभार्थीनिहाय वितरण, वितरकाची साठा नोंदवही व विक्री बिलांची तपासणी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी वेळोवेळी करावी.

१५.यासाठी आवश्यक निधी मागणी, बियाण्याचा पुरवठा आदेश तसेच पुरवठादार संस्थेचे देयक **उपविभागीय कृषि अधिकारी** यांनी या कार्यालयास सादर करावे. त्यानुसार आवश्यक निधीची तरतूद करण्यात येईल.

१६.मिनीकीटसाठी निवडलेल्या लाभार्थ्यांच्या क्षेत्रावर बीजप्रक्रिया, पेरणी पद्धत, एकात्मिक खत व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, काढणी व काढणीपश्चात व्यवस्थापन इ. तंत्रज्ञानाबाबत प्रात्यक्षिकाद्वारे व इतर माध्यमाद्वारे मार्गदर्शन करावे.

१७.यासोबतच लाभार्थ्यांच्या क्षेत्रावर हवामान अनुकूल तंत्राचा (Climate Resilient Technology) अवलंब करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे.

# परिशिष्ट १
## खरीप हंगाम २०२६ करीता भरडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढीसाठी बियाणे मिनीकीट वितरण लक्षांक

| जिल्हा | ज्वारी मिनी कीट (३ किलो) | | बाजरी मिनी कीट (१.५ किलो) | | नाचणी मिनी कीट (१ किलो) | | एकूण मिनी कीट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | क्षेत्र (हे) | संख्या | क्षेत्र (हे) | संख्या | क्षेत्र (हे) | संख्या | क्षेत्र (हे) |
| **नाशिक विभाग** | | | | | | | | |
| नाशिक | - | - | ५०० | २०० | २५०० | ५०० | ३००० | ७०० |
| जळगाव | - | - | ५०० | २०० | २५० | ५० | ७५० | २५० |
| **छत्रपती संभाजीनगर विभाग** | | | | | | | | |
| छत्रपती संभाजीनगर | - | - | ५०० | २०० | - | - | ५०० | २०० |
| जालना | - | - | ५०० | २०० | - | - | ५०० | २०० |
| बीड | - | - | ५०० | २०० | - | - | ५०० | २०० |
| **लातूर विभाग** | | | | | | | | |
| परभणी | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| लातूर | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| नांदेड | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| धाराशीव | ५०० | २०० | ५०० | २०० | - | - | १००० | ४०० |
| **अमरावती विभाग** | | | | | | | | |
| अमरावती | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| यवतमाळ | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| वाशिम | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| बुलढाणा | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| अकोला | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| **नागपूर विभाग** | | | | | | | | |
| वर्धा | ५०० | २०० | - | - | - | - | ५०० | २०० |
| गडचिरोली | - | - | - | - | २५० | ५० | २५० | ५० |
| **एकूण** | ५००० | २००० | ३००० | १२०० | ३००० | ६०० | ११००० | ३८०० |

महाबीज

सुवर्ण महोत्सव

**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित,**
**महाबीज भवन, कृषी नगर, अकोला.**
**पीबीएक्स–०७२४–२४५५०९३ फॅक्स–२४५५१८७, २४५५२८७**
Mail:homarketing@mahabeej.com CIN: U01200MH1976SGC018990 Web: www.mahabeej.com

---

संदर्भ: महाबीज / अकोला / विपणन / २०२६ / 132 दिनांक १६ / ०५ / २०२६

प्रति,

मा.प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प,
मुंबई

विषय:–खरीप–२०२६ हंगामाकरीता संकरीत ज्वारी, संकरीत बाजरा, नाचणी व संकरीत मका वाणाची उपलब्धता कळविणेबाबत.

संदर्भ:– दुरध्वनीवरील चर्चा दिनांक १६.०५.२०२६

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला (महाबीज) कडे खरीप–२०२६ हंगामाकरीता उच्च दर्जाचे संकरीत ज्वारी, संकरीत बाजरा, नाचणी व संकरीत मका बियाणे उपलब्ध आहे. सदर बियाणे नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पा अंतर्गत वाटप केल्यास शेतक–यांना योजनेचा लाभ घेता येईल. पिक व वाण निहाय बियाण्याची उपलब्धता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पिक व वाण | उपलब्ध मात्रा क्विंटल मध्ये | पॅकींग साईज | प्रति हेक्टरी लागणारे बियाणे | विक्री दर रु. प्रति क्विंटल |
|---|---|---|---|---|---|
| १ | सं.ज्वारी महाबीज–७०४ | १०० | ३ किलो | ७.५ किलो | १४५००/– |
| २ | सं.ज्वारी भाग्यलक्ष्मी–२९६ | ५० | ३ किलो | ७.५ किलो | १४५००/– |
| ३ | सं.ज्वारी सी.एस.एच.–९ | ३५० | ३ किलो | ७.५ किलो | १३५००/– |
| ४ | सं.मका उदय | ८०० | ४ किलो | २० किलो | २३०००/– |
| ५ | सं.मका महाबीज–१७०८ | १५० | ४ किलो | २० किलो | २३०००/– |
| ६ | सं.बाजरी महाबीज–१००५ | १२० | १.५ किलो | ४.५ किलो | १९०००/ |
| ७ | नाचणी फुले कासारी | १५० | १ किलो | ५ किलो | १५०००/– |
| ८ | नाचणी दापोली–३ | ३० | १ किलो | ५ किलो | १५०००/– |
| ९ | नाचणी सी.एफ.एम.व्ही.–२ (गिरा) | ३० | १ किलो | ५ किलो | १५०००/– |
| १० | नाचणी सी.एम.एफ.व्ही.–३ (एकविजय) | २० | १ किलो | ५ किलो | १५०००/– |

वरील प्रमाणे बियाणे नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पा मध्ये समाविष्ट करण्यात यावे. जेणेकरुन शेतक–यांना उच्च दर्जाचे बियाणे वापरुन उन्नती साधता येईल. करीता योजने मध्ये बियाणे पुरवठा आदेश पारीत करावे ही विनंती.

करीता माहीतीस्तव सविनय सादर.

म.रा.बि.म.मर्या.करीता.

(विजयकुमार देशमुख)
महाव्यवस्थापक (विपणन)
अकोला.

प्रतिलिपी,

१.मा.व्यवस्थापकीय संचालक, महाबीज अकोला, यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२.मा.महाव्यवस्थापक (गुनि व संशोधन) महाबीज अकोला, यांना माहीतीस्तव सविनय सादर.